# तिघांच्या हत्येने हादरले शहर

## जयस्तंभ चौक, मसानगंज, बडनेऱ्यातील घटना | एक युवक चाकू हल्ल्यात गंभीर

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.7 )-शहरात गेल्या चोविस तासात दोन जणांचा हत्येचा थरार घडला. तर बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका तरुण चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झाला आहे. रविवारी सायंकाळी जयस्तंभ चौकात एका तरुणाची हत्या करण्यात आली, तर सोमवारी भर दिवसा दुपारच्या सुमारास मसानगंज परिसरात एका तरुणाची हत्या करण्यात आली आहे. बडनेरातील राम मेघे परिसरात एका अज्ञात युवकाचा मृतदेह आढळून ज्याची हत्या झाला असल्याचे निष्पन्न झाले. बडनेरामध्येच चाकू हल्ल्यात एक तरुण गंभीररित्या जखमी झाला आहे. ज्याला अत्यवस्थ अवस्थेत नागपूरला रेफर करण्यात आले आहे.*

### जुन्या वैमनस्यातून अल्पवयीनांना केले ठार

जुन्या वैमनस्यातून सहा अल्पवयीन मुलांनी चाकूने हल्ला करून, एका तरुणाची हत्या केली. प्रेमराज उर्फ मोंटू अनिल गोळे (25, रा. दत्तवाडी, महाजनपुरा, खोलीपुरी गेट) असे मृताचे नाव आहे. ही घटना रविवारी सायंकाळी 6 वाजताच्या सुमारास सिटी कोतवाली पोलीस स्टेशनच्या हद्दीतील जयस्तंभ चौकातील घडली. या घटनेची तक्रार अजय विजयराव वानखडे (25, रा. खरकाडीपुरा) यांनी 6 सप्टेंबर रोजी रात्री शहर कोतवाली पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी सहा अल्पवयीन मुलांविरुध्द खुनाचा गुन्हा नोंदविला आहे. यातील चार जणांना रविवारी ताब्यात घेण्यात आले होते, तर एकाला सोमवारी ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांची बाल सुधार गृहात रवानगी केली आहे. तर एका मुलाचा शोध पोलिस घेत आहेत.



### बडनेरात तरुणावर चाकूने हल्ला

सोमवारी सकाळी बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील छत्री चौकात मित्र असलेल्या तिन तरुणांचा वाद झाला. दरम्यान त्यांचा वाद विकोपाला जाऊन दोघांनी एका मित्रावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात मजहर खान (30, रा. चमननगर) हा गंभीर जखमी झाला. त्याला नागपूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. याप्रकरणात पोलिसांनी आरोपी स्वप्निल बेडेकर (37) व रजत रामटेके (25, दोन्ही रा. मिलचाळ, बडनेरा) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदवून, त्यांना अटक केली आहे, अशी माहिती बडनेरा पोलिसांनी दिली.

### राम मेघे कॉलेज जवळ आढळला मृतदेह

बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राममेघे कॉलेजवजळील एका शेतात 25 ते 30 वयोगाटील एका तरुणाचा मृतदेह आढळून आला. सोमवारी सायंकाळी ही घटना उघडकीस आली. या तरुणाच्या अंगावर शस्त्राच्या जखम असल्यामुळे त्याची हत्या झाल्याची माहिती बडनेरा पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला आहे. मृताची ओळख अद्याप पटली नसून, पोलिस ओळख पटविण्याचे प्रयत्न करीत आहेत.

### मसानगंज परिसरात खुनी हल्ला

सोमवारी दुपारी मसानगंज परिसरात जुन्या वादातून एका तरुणाची चाकूने हल्ला करून हत्या करण्यात आली. वैभव हुकुमचंद पटेरिया (24, रा. मसानगंज) असे मृताचे नाव आहे. प्रविणनगरातील रहिवासी शुभम मोहोड नामक तरुणासोबत काही दिवसांपूर्वी वैभवचा वाद झाला होता. त्यावेळी नागपुरी गेट पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली होती. त्याची चौकशी पोलिस करीत होते. अशातच सोमवारी दुपारी वैभव पटेरिया हा मसानगंज परिसरातील वर्मा ज्वेलर्स नामक दुकानाजवळ उभा असताना, त्याच्यावर शुभम मोहोड व त्याच्या काही साथीदारांनी अचानक चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात वैभव गंभीर जखमी झाला. या घटनेच्या माहितीवरून नागपुरी गेट पोलिसांनी घटनास्थळ गाठून वैभवला तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. परंतू डॉक्टरांनी वैभवला मृत घोषीत केले. याप्रकरणात पोलिसांनी शुभम मोहोडसह त्याच्या साथीदारांविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलिस आरोपींचा शोध घेत आहे.



# आरटीओ एजन्ट निघाला घरफोड्या

## 4 लाख 93 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त

### आठ गुन्हे उघडकीस



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 ) –** गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने घरफोडी करणार्या एका आरटीओ एजन्टला रविवारी अटक केली. अंकुश ऊर्फ अनिकेत गुणवंत कावरे (27, रा. पिंपळखुटा अर्मळ, पो. स्टे फेजरपुरा) असे आरोपीचे नाव आहे. त्याने घरफोडीचे आठ गुन्हे केल्याची कबुली दिली असून, पोलिसांनी त्याच्या ताब्यातून 4 लाख 93 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गेल्या काही दिवसापासून गाडगेनगर व नादंगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विरळ वस्तीमध्ये दिवसा घरफोडीच्या घडत होत्या. त्यामुळे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सदर गुन्हे उघडकीस आणण्याबाबत गुन्हे शाखेला आदेशीत केले होते. या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 चे अधिकारी व अमलंदार यांनी घटनास्थळाला भेट दिली असता, बर्याच ठिकाणी घरफोडी करण्याची पध्दत हि एक सारखीच असून, बहुतेक गुन्हे करणारा आरोपी एकच असल्याचे निदर्शनास आले. दरम्यान पोलिस दोन ते तीन महिन्यापासून सदर भागात पेट्रोलिंग करून गुप्त माहिती काढत असताना, एक इसम हा हिरो होंडा शाईन या गाडीने सदर भागात येत असून घरफोडीकरून जात असल्याचे निदर्शनास आले. तो इसम हा पिपंळखूटा येथील कावरे नामक इसम असल्याचे निदर्शनास आले. या माहितीवरून पोलिसांनी पिपंळखुटा (अर्मळ) येथील इरामास गाडीसह ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता, नांदगाव पेठ हद्दीत गुन्हा केल्याचे कबूल केले. त्यामुळे पोलिसांनी सदर गुन्हात त्याला अटक करून न्यायालायाकडून पोलीस कोठडी प्राप्त केली. दरम्यान पोलिस कोठडीतील चौकशीनंतर त्याने शहरातील इतरही घरफोड्याची कबूली दिली.

### विरळ वस्तीतील घरांना करायचे लक्ष्य

पोलिसांनी आरोपीची चौकशी केल्यानंतर तो आरटिओ ऑफीसमध्ये एंजट म्हणून काम करीत असल्याचे निदर्शनास आले. तो पिपंळखुटा अर्मळ येथून एमएच 27 बीसी 5347 या क्रमांकाच्या दुचाकीने जात होता आणि दुपारी गाडगेनगर व नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विरळ भागातील बंद घराला लक्ष्य करायचा. ही बाब पोलिस चौकशीत पुढे आली.

### मुथुट फायनान्सकडे ठेवले दागिने गहाण

आरोपी अंकुश कावरे हा चोरीत मिळालेले सोन्याचे दागिने जयस्तंभ चौकातील मुथुट फायनान्स येथे गहाण ठेवून कर्ज मिळवित होता. त्याने बर्याच घरफाडीतील सोन्याचे दागीने मुथुट फायनान्स येथे गहाण ठेवल्याचे पोलिस तपासात निषन्न झाले आहे. 58 ग्रॅम वजनाचे दागिने ताब्यात घेण्याबाबत पोलिसांची कायदेशिर कार्यवाही सुरु आहे.

### 4 लाख 93 हजार 740 रुपयांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी या गुन्ह्यात 62 ग्रॅम वजनाचे दागिने, रोख व गुन्ह्यातील दुचाकी असा एकुण 4 लाख 93 हजार 740 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.







आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# त्या वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या सायकलींचे बच्चु कडूंच्या हस्ते वाटप

## विरोधकांच्या हाती आयते कोलीत | तक्रारदाराकडून थेट मुख्यमंत्र्यांना साकडे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )–** जिल्हा परिषद मधील शिक्षण विभाग मध्ये ग्रामविकास आणि पंचायत राज विभागामार्फत 1 कोटी रुपयांचा 1800 सायकली पुरविण्याबाबतची निविदा काढण्यात आली होती. एकच निविदा तीनवेळा काढण्यात आल्याने ही निविदा प्रक्रीया राबविणारे अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. जवळच्या ठेकेदाराला लाभ पोहोचविण्याकरता हा प्रकार करण्यात आल्याची माहिती आहे, या प्रकरणात आता थेट मुख्यमंत्र्यांना तक्रार करण्यात आली आहे. विशेष म्हणजे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या या सायकलींचे अचलपूर मतदारसंघात आ.बच्चू कडु यांच्या हस्ते वितरण केले जात आहे. त्यामूळे आता आ. कडू यांच्या विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाले आहे.

माहितीनूसार या कंत्राट पुर्वी एका दुसऱ्या कंत्राटदाराला नियमानुसार मिळाला होता, परंतू आ.कडू यांच्या निकटवर्तीयाने आपले आर्थिक हित साधण्याकरिता शिक्षणाधिकाऱ्यांवर दबाव टाकून हा कंत्राट नियमबाह्य पध्दतीने न्यु शर्मा ब्रदर्स यांना देण्यात आल्याची माहिती तक्रारकर्ते शहेजाद खान यांनी केली आहे. 13 सप्टेंबर 2024 ला रोजी या निविदा संदर्भात जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांच्या कडे दाखल केलेल्या तक्रारीमध्ये सांगितल्याप्रमाणे सुरवातीला न्यू शर्मा ब्रदर्स यांना या निविदेकरिता अपात्र ठरविले होते. परंतू आ.कडूंच्या 'राईट हँड' ने 'सबका मंगल' करण्याकरिता शिक्षणाधिकाऱ्यांशी बोलणी करुन निविदेमध्ये सुधारणा करुन सदर कंत्राटदार न्यु शर्मा ब्रदर्स याला लाभ पोहोचविला असल्याचे तक्रारीत सांगण्यात आले आहे. याप्रकरणी सिईओ पासून ते शिक्षणाधिकाऱ्यांपर्यंत तक्रार करण्यात आल्यावर कुणीही यांची योग्य दखल न घेतल्याने आता, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तक्रार करण्यात आली आहे. यामध्ये मुख्यमंत्री काय भूमिका घेतात हे पाहण्यासारखे राहील.



### सायकल पुरवठ्यातही घोळ

तक्रारदाराने माहिती दिली की, निविदेमध्ये सांगितल्याप्रमाणे पुरवठादार कंत्राटदाराला दंडा असलेली सायकलचा पुरवठा करणे गरजेचे होते, परंतू कंत्राटदाराने अन्य सायकल चा पुरवठा केल्याचे सांगितले जात आहे. राजमाता अहिल्याबाई होळकर सायकल बँक योजना, या नावाने आ.बच्चू कडू यांच्या या सायकलींचे वाटप विद्यार्थ्यांना केले जात आहे. आज (दि.7) चांदूर बाजार येथे या सायकल वितरणाचा कार्यक्रम पार पडला, तर 9 ऑक्टोबर रोजी परतवाडा येथे या सायकलींचे वितरण होणार आहे. आतापर्यंत 55 लाखांच्या सायकलींचे वाटप झाल्याची अनधिकृत माहिती आहे. मात्र या प्रकारामूळे आगामी विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर विरोधकांच्या हाती आयते कोलीत सापडले आहे.

तक्रार च्या अनुषंगाने आम्ही संबधितांना कळविले आहे. याबाबत मुख्याधिकारी मॅडम यांनाही सांगितले आहे. पत्राची नक्की तारीख सांगू शकत नाही, मात्र आम्ही कळविले आहे.

**प्रिया देशमुख,**
**शिक्षणाधिकारी**
**प्रा. जिल्हा परिषद, अमरावती.**

### शासन चौकशी करणार नाही



वरवर जरी बच्चू कडू, मुख्यमंत्र्यांविरोधात बोलत असतील, तरी आतून दोघांचीही हातमिळवणी झाली आहे. त्यामूळे बच्चू कडू यांच्या कोणत्याच प्रकरणात शासन चौकशी करणार नाही. त्यांनी आतापर्यंत जिल्हा परिषद व जिल्हा बँकेचा स्वतऱ्ची प्रॉपर्टी समजून वापर केला आहे. 1 महिन्यात अचलपूर मतदारसंघात सत्तापालट होवून महाविकास आघाडीकडून मी निवडून येईल, त्यानंतर यांचे सर्व 2 नंबरचे कामे बाहेर काढण्यात येईल.

**अनिरुध्द उर्फ बबलू देशमुख,**
**अध्यक्ष जिल्हा काँग्रेस कमिटी, अमरावती.**

### शिक्षणाधिकाऱ्यांना कळविले



मी माध्यमिक शिक्षण अधिकारी यांना ते पाठवले होते.याप्रकरणी त्यांनी उत्तर द्यावे असे मी त्यांना कळविले होते.

**संजीता मोहपात्रा,**
**मुख्याधिकारी, जि.प.अमरावती.**

### काय म्हणतो तक्रारदार

मी केलेल्या तक्रार संदर्भात कुठलेही प्रकारचे उत्तर मला पत्र किंवा अन्य माध्यमातून माहिती कळविण्यात आले नाही. त्यामुळे या प्रकरणी अधिकारी हेच अधिक जास्त समाविष्ट असल्याचे दिसत आहे. माझ्या नावाचे कुठलेच पत्र मला प्राप्त झाले नाही. त्यामुळे या प्रकरणी तक्रारीची चौकशी कोण करेल? आणि न्याय मिळवून देईल, हा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे आता मी माझी तक्रार मुख्यमंत्री आणि विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांचे दाखल केली.

**शहाजाद खा, तक्रारदार, अमरावती.**

# अंजनगाव बारीत 10 सार्वजनिक मंडळात दुर्गोस्थापना

**8 मंदिरांमध्येही घटस्थापना**

*महासागर प्रतिनिधी*

*अंजनगाव बारी,( दि.7 )– परिसरात दरवर्षी नवरात्रीउत्सोवात आनंदाची भर पडत असुन, जनमानसात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील वर्षी 8 सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळ असुन यावर्षी ही संख्या 10 एवढी झाली आहे. तर दरवर्षी प्रमाणे गाव परिसरात 8 मंदिराच्या ठिकाणी घटस्थापनेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भवानी माता, तेलाई माता, मरामाय, मातामाय, राणामाय, आसरा माता, रामगीर महाराज, निदानजी महाराज इ.मंदिराचा समावेश आहे. तर यापैकी भवानी माता, तेलाई माता व राणामाय ही ठिकाणे उल्लेखनीय असुन पर्यटन स्थळांमध्ये यांचा उल्लेख होतो.*



**राणामाय टेकडी** – या टेकडीचा इतिहास हा ख्रिस्त पुर्व कालखंडातील असुन त्याकाळी कुणीतरी या ठिकाणी राणामायची स्थापना केली. त्यावेळेपासून त्याठिकाणाला राणामाय टेकडी हे नाव पडले. या टेकडीच्या आत सोन्याचा साठा असल्याचेही बोलल्या जाते. तसेच या टेकडीला लागूनच गैबी शहा दर्गा तसेच तलाव असल्याने व हा परिसर सदाहरित असल्याने या ठिकाणी हजारो पर्यटक आपली हजेरी लावतात. याचबरोबर मरामाय, मातामाय, आसरा माता, रामगीर महाराज देवस्थान, निंदानजी महाराज देवस्थान इ.मंदिरात घटस्थापनेचे आयोजन केल्या जाते.



**तेलाई माता मंदिरा** – अंजनगाव बारी ते पार्डी (देवी) मार्गाला लागूनच एका भव्य वडाचे झाडाखाली शेकडो वर्षे पुरातन दगडावर तेलाई मातेची कलाकृती करून त्याची स्थापना करण्यात आली होती. दिवसेंदिवस या ठिकाणच्या विकास कमाला गती येत गेली, आज या ठिकाणी भव्य सभामंडपाचे बांधकाम करण्यात आले. बाजुलाच शनि देवाची स्थापना करण्यात आली व गेल्या 50 वर्षांपासून सुरू असलेल्या येथील घटस्थापनेच्या उत्सवात मोलाची भर पडली असुन हा वनक्षेत्रातील परिसर नवरात्रीउत्सवात दिव्यांनी व आकर्षक रोषणाईने उजळून निघतो.

नऊ दिवस या सर्व ठिकाणी विविध नाट्यमय, भक्तीमय कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. दररोज गावातील महिला तसेच मुली संध्याकाळी दिवे घेऊन देवीच्या पुजेकरीता जातात. आरत्या, भजन, कीर्तनाच्या रंगात सर्व ठिकाणी हा नवरात्रीत्सोव मोठ्या उत्साहाने साजरा होतो. तर येणाऱ्या एकादशीच्या दुसऱ्या दिवशी बारशीला सर्व सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळ तसेच घटस्थापनेच्या ठिकाणी भव्य महाप्रसादाचे आयोजन केल्या जाते.याचा लाभ गाव तसेच परिसरातील सर्व नागरीक घेतात व विसर्जनाच्या दिवशी ढोल, ताशे, डी.जे. च्या गजरात दुर्गामातेचे विसर्जन श्री तिर्थक्षेत्र कोंडेश्वर येथील तलावात पोलिस बंदोबस्तात केले जाते.



भवानी माता मंदिर–हे मंदिर इ.स.16 व्या शतकातील असुन याठिकाणी लागूनच शिवकालीन पक्क्या माती व फळ्यांमध्ये बांधलेली गढी आहे. या गढी मध्ये भुयार असून तो रस्ता तिर्थक्षेत्र कोंडेश्वरला जोडला जात असल्याचे सांगितले जाते.

# 'लिव्ह इन' मध्ये राहणाऱ्या महिलेच्या हाताची बोटे कापली

**दोघांमध्ये टीव्हीवरून वाद**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 ) –** वेगवेगळे राहण्याकरिता घरातील सामान वाटप करीत असताना महिलेने टीव्ही स्वतऱ्कडे ठेवला. त्यावर तो टीव्ही माझा असे बजावत आरोपीने तिच्याशी वाद घातला. आरोपीने सामानात पडलेला भाजी कापण्याचा चाकू महिलेला मारला. तो तिने अडविला; मात्र तो लागून महिलेच्या उजव्या हाताची बोटे कापली गेली. ही घटना यशोदानगर येथे 5 ऑक्टोबर रोजी दुपारी 1.30 वाजताच्या सुमारास घडली. या घटनेप्रकरणी, फ्रेजरपुरा पोलिसांनी शनिवारी सायंकाळी आरोपी अमित बन्सोड (रा. यशोदानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. फिर्यादी आणि आरोपी हे पाच वर्षांपासून लग्न न करता एकत्र राहत होते. त्यांचे एकमेकांवर प्रेम होते. आरोपीपासून फिर्यादीस दोन वर्षाची मुलगीदेखील आहे. आरोपीस दारूचे व्यसन असल्याने फिर्यादी महिलेने आरोपीला आपण वेगवेगळे राहू, असे बजावले. त्यामुळे आरोपीने फिर्यादीस मारहाण केली.

### महिलेवर अत्याचार

**अमरावती** – अमरावती न्यायालयात तारखेवर आलेल्या महिलेला दोन तरुणांनी यवतमाळ व पुसद घाटात नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या घटनेची तक्रार महिलेने 6 ऑक्टोबर रोजी गाडगेनगर पोलीस ठाण्यात दिली आहे.

# रेल्वे समोर उडी घेऊन चौकीदाराची आत्महत्या

**राजापेठ हद्दीतील घटना**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 ) –** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रसन्न जीम समोरील बडनेरा रेल्वे लाईनवर उडी घेऊन एका तरुणाने आत्महत्या केली. उमेश रामदास उंबरकर (35, रा. टेंभुरसोंडा, धारणी) असे मृताचे नाव आहे. उमेश हा चौकीदाराचे काम करीत होता, अशी माहिती पुढे आली आहे.

सतीश आनंदराव काकडे (42, रा. रेवसा, वलगाव) यांनी पोलिसांना माहिती दिली की, उमेश हा मुळचा टेंबुरसोडा येथील रहिवासी आहे. तो अमरावतीमधील डिमार्ट मागील बॉक्स क्रिकेट प्ले ग्राऊन्डजवळील चोरडीया यांच्याकडे चौकीदाराचे काम करीत होता. त्याची पत्नीपासून फारकत झाली होती. त्यामुळे एकटा खोली करून राहत होता. तसेच त्याचे मामा मानदेवराव काकडे (रा. परतवाडा) यांचे एक महिन्यापूर्वी अपघाती निधन झाले. त्यामुळे उमेश हा मानसिक तणावात होता. त्यामुळे तो अधुनमधुन दारू पित होता. दरम्यान 6 सप्टेंबर रोजी सतीश काकडेला त्यांचा परिचीत असणारा राजु आखरेचा फोन आला आणि त्याने सांगितले की, तुझा आतेभाऊ उमेशचा रेल्वे लाईनवर अपघात झाला. या माहितीवरून सतीश यांनी घटनास्थळी जाऊन पाहीले असता, उमेश हा गंभीर जखमी अवस्थेत पडून होता. दरम्यान तेथे पोलिस पोहोचले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून उमेशला तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. त्यावेळी डॉक्टरांनी उमेशला मृत घोषीत केले. याप्रकरणात सतिश काकडेंच्या माहितीवरून राजापेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

# अखंड ज्योत सप्ताहात 659 घटांची स्थापना



### मालखेड येथे अंबा देवीचा नवरात्र उत्सव

**रवि कलाने**

**मालखेड रेल्वे,( दि.7 )–** स्थानिक भानामती नदीच्या काठावर वसलेल्या मालखेड गावात निसर्गरम्य वातावरणात वास्तव्य असलेले अंबा मातेचे आणि शिवशंकराचे मंदिर आहे, या मंदिरात नवरात्री उत्सवानिमीत्त यंदा अखंड ज्योत सप्ताहात 659 घटांची स्थापना करण्यात आली आहे, जे भाविकांकरिता श्रध्देचे व विशेष आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

अंबा माता मालखेडवासीयांचे ग्रामदैवत ओळखल्या जाते. या मंदिराचा इतिहास जाणून घेतांना अशी माहिती मिळते की, जुन्या काळातील विदर्भ प्रदेशाचा राजा वृषभदेव यांना 10 मूल होती या 10 मुलाला राजधानीच्या सभोवताली निवासस्थाने वाटून देताना त्या मुलांच्या नावावरून त्यांची निवासस्थान ओळखल्या जात होती, त्यापैकीच एक केतुमाल नावाचा मुलगा होता, त्याच्याच निवासस्थानी शेजारी जी वस्ती वसल्या गेली, तिला मालकेतू म्हणून ओळखल्या जाऊ लागले. या मालकेतू नावाचा अपभ्रंश होऊन पुढे मालखेड नाव प्रचलित झाले. याच मालकेतू वस्तीचा उल्लेख श्रीमद भागवत आणि देवी भागवत यात आढळतो. याच केतुमाल राजाने मालकेतू या वस्ती शेजारी असणाऱ्या दक्षिण वाहिनी भानामती नदीच्या काठी अंबा मातेची आराधना केली. त्याची आराधना आणि भक्ती भाव पाहून अंबा माता प्रसन्न होऊन साक्षात प्रकटली व मालकेतू ला इच्छित वर मागण्याकरिता सांगितले, त्याने धन, वैभव न मागता येथेच भक्तांच्या मनोकामना तथा त्यांच्या कल्याणासाठी येथेच विराजमान होण्याची विनंती केली. देवीने ते मान्य करून तेथेच विराजमान झाली, म्हणून येथील अंबामातेची मूर्ती ही स्वयंभू व मनोकामना पूर्ण करणारी आहे असे सांगण्यात येते.



सम्पूर्ण महाराष्ट्रातील भाविक मोठ्या संख्येने मंदिरात दर्शना करिता येतात, विशेष म्हणजे शिवालय तथा अंबामाता यांचे एकाच ठिकाणी असणारे हे मंदिर आहे. मंदिराला लागून असलेली भानामती नदी ही दक्षिणवाहिनी नदी असून या नदीच्या तीरावर केलेली पूजा विधी ही लवकरच सफल होते. असा समज प्रचलित आहे चोहीकडे हिरवेगार निसर्गरम्य परिसर हे सर्व दृश्य डोळे दिपविणारे आहे. या देवीच्या दर्शनाने आत्मिक समाधान मिळते. अशी भक्तांची श्रद्धा आहे. भाविकासाठी हे श्रद्धेचे स्थान असून नवरात्रीच्या दरम्यान नऊ दिवस येथे मोठा उत्सव साजरा केला जातो. 1997 पासून या अखंड ज्योत स्थापनेची सुरवात झाली, तेव्हापासून दरवर्षी अविरतपणे ही परंपरा सुरू आहे, यावर्षी मात्र 659 घटांची स्थापना केल्या गेली असून दरवर्षी हा आकडा वाढत जात आहे दररोज सकाळी आणि सायंकाळी होणाऱ्या महाआरतीला शेकडो भक्त गणांची हजेरी असते.

गावातील पंडित संजयपंत जोशी महाराज हे आरतीची तयारी करतात. दरवर्षी या काळात भव्य महाप्रसादाचे आयोजन केले जाते. आजूबाजूच्या खेड्यापाड्यातील नागरिक याचा लाभ घेतात, यावर्षीही भव्य महाप्रसादाचे आयोजन 14 ऑक्टोबर सोमवारला केले आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिरातील ग्रामस्थ आयोजक, कार्यकर्त्यांनी केले आहे.

### 'ब' दर्जा देण्याची मागणी

गेल्या 30 वर्षांपासून तपस्वी शिवानंद पुरी महाराज हे सेवेत कार्यरत आहेत तसेच ते श्री पंचदशनाम जुना आखाडा सचिवपदी आहे ते आलेत तेंव्हापासून मंदिराचा जीर्णोद्धार होत गेला, असे मत गावकरी व्यक्त करतात शिवाय अंबा देवी संस्थानचे विश्वस्त अशोकराव देशमुख हे देखील मंदिराच्या सौंदर्यीकरणा करिता परिश्रम घेत आहेत. अंबा माता आणि शिव मंदिर एकत्र वास्तव्य असलेले ठिकाण असल्याने वर्षभर अध्यात्मिक कार्यक्रमांची मेजवानी असते त्यामुळे वर्षभरात असंख्य भाविक येथे भेट देण्यासाठी येतात, सर्व सोयी सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मंदिराला %ब% दर्जा देण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने केली जात आहे.

# कंत्राटदारामुळे नागरिकांच्या जीवितास धोका

### 15 दिवसांपासून खोदुन ठेवला रस्ता

### कासव गतीने सुरू आहे काम



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.7 )–** तालुक्यातील काटी, वाडेगाव हा रस्ता मंजुर होऊन कामाला सुरुवात झाली. अर्धाअधिक रस्ता खोदुन ठेवला. मात्र काम संथगतीने सुरू आहे. यामुळे खोदुन ठेवलेल्या रस्त्यात अपघात होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने तत्काळ काम सुरू करण्यास कंत्रातदारास सूचित करण्याची मागणी नागरिकांची आहे.

वाडेगाव ते काटी हा रस्ता आमला पुलगाव या आंतरराष्ट्रीय महामार्गाला जोडणारा आहे.

वाडेगाव वरून काचुरणा, लोणी, हिवरखेड व अमरावती मार्गाला जोडल्या गेला. या 1 कि.मी रस्त्याचे काम 20 दिवसापासून संथगतीने सुरू आहे. यात काही ठिकाणी वन क्षेत्र येत असल्याने डांबरीकरण व काही ठिकाणी सिमेंट काँक्रीटचा मार्ग करण्यात येत असल्याचे सांगण्यात येते. रस्ता खोदुन ठेवल्यामुळे उर्वरीत रस्ता हा फक्त 10 फुटाचा आहे. यामुळे वाहने नेण्यास कसरत करावी लागते. अपघाताची शक्यता लक्षात घेता व दुर्गादेवी विसर्जनासाठी हाच एकमेव रस्ता असल्याने कामाची गती वाढविण्यासाठी कंत्राटदारास अवगत करण्याची मागणी पुढे आली आहे.

# महाविकास आघाडीच्या उमेदवारीसाठी भाजपातील नेत्यांची चढाओढ

## अनेकांनी दिल्या मुलाखती

**विलास पाटील**

**वरुड,( दि.7 )** – येत्या काही दिवसावर विधानसभेच्या निवडणुका होणार आहे. त्यासाठी महाविकास आघाडीची उमेदवारी मिळावी यासाठी वरुड, मोर्शी मतदार संघातील भाजपच्या गोटातील इच्छुक हे भाजपा प्रणित महायुतीला पाठ दाखवून महाविकास आघाडीकडे धाव घेताना दिसून येत आहे. लोकसभेच्या निकालानंतर वरुड, मोर्शी मतदार संघामध्ये महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून येण्याची शक्यता अधिक असल्याचे गणित तज्ञांकडून वर्तविल्या जात आहे. भाजपातील काही जेष्ठ नेते उमेदवारी मिळण्यासाठी महाविकास आघाडीमध्ये मुलाखतीही देवून आले असल्याच्या चर्चेला उधाण आले असल्याने विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर भाजपात फुट पडण्याचे चिन्ह दिसत आहे

सन 2019 ला काँग्रेस राष्ट्रवादी व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार देवेंद्र भुयार हे आमदार म्हणून निवडून आले होते. राष्ट्रवादीचे दोन तुकडे झाल्यानंतर ते अजित पवार यांच्या गटात गेले, आणि महायुतीची उमेदवारी मिळण्यासाठी प्रयत्न करित आहे. इतकेच नव्हे तर अजित पवार येथे झालेल्या एका कार्यक्रमात भूयार यांना महायुतीची उमेदवारीही निश्चित केली. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला उमेदवारी मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. भारतीय जनता पक्षातील गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले इच्छूक मविआकडून उमेदवारी मिळावी याचा प्रयत्न करित आहे, तर काही अपक्ष जोर मारण्याकरिता चाचपणी करित आहेत.




### आतापर्यंत चौघांचा प्रयत्न

भाजपातील जवळपास चार उमेदवारांनी महाविकास आघाडीकडे उमेदवारी मागितल्याची माहिती आहे. एवढेच नाही तर त्यांनी पुणे येथे जाऊन महाविकास आघाडीचे महाराष्ट्रातील सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडे उमेदवारी मिळण्यासाठी मुलाखती दिल्याचेही सुत्र सांगतात. असे झाल्यास भाजप दोन भागात वाटून महायुतीच्या उमेदवाऱ्याच्या नाकीनऊ येतील. वरूड–मोर्शी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे हर्षवर्धन देशमुख, काँग्रेसचे गिरीश कराळे व महायुतीचे देवेंद्र भुयार हे तीन नावे सध्या तरी निश्चित मानले जात आहे. तरी मात्र काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या तिन्ही पक्ष मिळून एक उमेदवार दिल्यास महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून येईल यात दूमत नसावे. आता ही उमेदवारी कुणाला मिळते त्यावर पुढचे गणित ठरेल हे ही तेवढेच खरे.

### अपक्षही मारु शकतो बाजी

सन 2024 च्या विधानसभेच्या निवडणुकीत वरुड–मोर्शी विधानसभेमध्ये अनेक उमेदवार उभे राहणार आहे, त्यामुळे या निवडणुकीमध्ये महायुती व महाविकास आघाडीमध्ये सरळ लढत होणार आहे. यात अपक्ष मात्र निर्णायक राहणार आहे. वेळ आल्यास अपक्ष उमेदवार सुद्धा विजयी होऊ शकतो, असा इतिहासही या मतदारसंघाचा आहे. विद्यमान आमदारांची नौका बुडण्याची अत्यंत दाट शक्यता आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीच्या उमेदवारीसाठी भाजपातीलच नव्हे तर अनेक पक्षातील नेत्यांची चढाओढ सुरू आहे. मात्र महाविकास आघाडीची उमेदवारी कोणाला मिळणार हे चित्र सध्यातरी स्पष्ट झाले नाही.

# वृक्षारोपण करुन साजरा केला काजल चा वाढदिवस

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.7 )**– आपल्या वाढदिवसाच्या दिवशी केक, हॉटेलिंग, मैत्रिणींची गर्दी हवी, असा कशाचाही मोह न बाळगता दरवर्षी आपल्या वाढदिवसाला वृक्षारोपण करण्याचा हट्ट करणाऱ्या 14 वर्षीय काजल जितेंद्र फुटाणे या बालिकेचा यंदाही वृक्षारोपण करुनच वाढदिवस साजरा करण्यात आला.



शनिवार( दि.5 ) ला तिच्या वाढदिवसाच्या दिवशी तिच्या वडीलांनी हिवरखेड येथील मोहोड नगर परिसरात वृक्षारोपणासह विविध सामाजिक कार्यक्रम घेतले. बदलत्या वातावरणाचा पर्यावरणावर होत असलेला विपरीत परिणाम लक्षात घेता काजल ही वाढदिवस पर्यावरणास पूरक असावा म्हणून वृक्षारोपण करुन साजरा करत असते. झाडांचे त्यांच्या सौंदर्यात्मक मूल्यापलीकडेही अनेक फायदे आहेत, ज्यात सावली देणे, हवेची गुणवत्ता सुधारणे, मातीची धूप कमी करणे आणि वन्यजीवांसाठी अधिवास निर्माण करणे समाविष्ट आहे. झाडे एक थंड आणि शांत वातावरण देखील तयार करते. जे एखाद्या ठिकाणाचे एकूण सौंदर्य वाढवू शकतात. याव्यतिरिक्त, झाडे त्यांची पाने, साल आणि फुलांद्वारे रंग आणि पोत प्रदान करून क्षेत्राच्या दृश्य आकर्षणात भर घालू शकतात, असे काजलचे म्हणने आहे. काजलचे कौतूक करुन वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन वृक्षप्रेमी नारायणराव मेंढे यांनी केले. हिवरखेड येथील महात्मा फुले हायस्कूल ची आदर्श विद्यार्थिनी वृक्षप्रेमी काजल फुटाणे हिच्या वाढदिवसानिमित्त आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी त्यांनी काजल हिला डॉ.केशवराव पाजनकर संपादित गौरवग्रंथ 卐वृक्षमित्र नारायणराव मेंढे, उद्गम आणि विकास हा स्व–जीवनावरील ग्रंथ वाढदिवसाच्या भेट स्वरूपात दिला. यावेळी मार्गदर्शन सनदी अभियंता हर्षल गहुकर यांनी वृक्षारोपणाचे विविध फायदे सांगितले. बिगीन्नर इंग्लिश स्कूल च्या मुख्याध्यापिका वैशाली आमले यांनी झाडांचे महत्व पटवून दिले.

## जाहीरनामा

उपरोक्त विषयाला अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, या न्यायालयातील नियमित दिवाणी दावा क. 1/2013. मनोरमा देशमुख व 4–वि– विठ्ठलराव देशमुख व 11. पुढील तारीख 18/10/2024 मध्ये वादी पक्षाने नवीन प्रतिवादी कमलाबाई रामचंद्र गवळी यांचा जाहीरनामा आपल्या वर्तमानपत्रात प्रकाशीत करण्याची परवानगी मिळणेचा अर्ज दिवाणी न्यायालय, क. स्तर, आष्टी, ता. आष्टी, जि. वर्धा येथे दाखल केला आहे व तो मंजुर करण्यात आला आहे.

करीता, जाहीरनामा आपल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रकाशीत करावा. त्याकरीता लागणारा सर्व खर्च अर्जदाराकडून परस्पर घेण्यात यावा. तसेच जाहीरनामा प्रसिध्दी झालेल्या वृत्तपत्राची एक प्रत व बिल मा. दिवाणी न्यायालय, क.स्तर, आष्टी येथे न चुकता सादर करावे.

शिक्का

**आदेशान्वये,**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, आष्टी.**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'हारून बूढ्ढू पटेल' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे, मिळकतीचे वर्णन – मौजे– अमरावती गावठाण, नझूल प्लॉट क्रं. 9 पैकी, नझूल शीट क्रं. 18–अ, फ्लॅट क्र. 203 पहिला माळा, गजानन बाबा अपार्टमेंट अ, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार 'हारून बूढ्ढू पटेल' यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी SMFG INDIA HOME FINANCE COMPANY LTD. येथे कर्जाकरीता अर्ज केला असता. वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 17/12/2004 रोजीचे दस्त क्र. 3089 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/ राष्ट्रीयकृत/ खाजगी//पतसंस्था/ सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय–नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

**आपला**
**Advocate**
**रवींद्र र. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो. नं. 9823698745**



# दिक्षाभूमीवर जाणाऱ्या वाहनांचा टोल मोफत करा!

## वंचित बहुजन युवा आघाडीचे निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** –धम्मचक्र प्रवर्तन दिनी नागपूर येथे दिक्षाभूमीवर अभिवादन करण्यासाठी जाणाऱ्या आंबेडकरी अनुयायांच्या वाहनांचा टोल मोफत करण्यात यावा अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीकडून टोल व्यवस्थापकांना करण्यात आली. एका निवेदनाद्वारे ही मागणी करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही नागपूर येथे दिक्षाभूमीवर 12 ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. देशभरातून लाखो अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी दीक्षाभूमी वर एकत्र येतात व तेथून सामाजिक एकतेचा संदेश घेऊन जातात. अनेक आंबेडकरी अनुयायी दुरून येतात व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेप्रति आपली श्रद्धा व्यक्त करतात. यावर्षी आषाढी महिन्यात पंढरपूर येथे जाणाऱ्या वाहनांना राज्य सरकारने टोल मोफत केला होता. त्याच धर्तीवर नागपूर–अमरावती महामार्गवर नांदगाव पेठ येथे असणाऱ्या टोलवरून नागपूर येथे दीक्षाभूमी वर जाणाऱ्या संपूर्ण गाड्या मोफत सोडण्यात याव्या अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे वतीने टोल व्यवस्थापक यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन सादर करतेवेळी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते, जिल्हा उपाध्यक्ष रिना गजभिये, अमरावती तालुका अध्यक्ष मयुरेश इंगळे, तिवसा तालुका महासचिव अमोल जवंजाळ, जिल्हा सदस्य प्रशांत गजभिये, अमरावती शहर उपाध्यक्ष शैलेश बागडे सह कार्यकर्ते उपस्थित होते.


**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**AMRAVATI ELECTRICAL DIVISION,**
**PUBLIC WORKS DEPARTMENT, AMRAVATI.**
**TENDER NOTICE NO. 40 FOR 2024-2025**

Online tenders in B-1 form are invited by Executive Engineer, Amravati (Electrical) Division, Public Works Division, Amravati on behalf of Governor of Maharashtra from qualified bidders for the following works under Manually Submition Tender procedure.

| Sr. No. | Name of Work | Amout Put to Tender | E.M.D. |
|---|---|---|---|
| 1 | **Estimate No. 176/EE/AMT/2023-24,** Providing Renovation of Pradhan Mantri Gram Sadak Yojana EE Office, AMRAVATI. | 513112.00 | 5200.00 |
| 2 | **Estimate No. 1430/EE/AMT/2023-24,** Providing Electrical Installation at Eye Care (Ward No.7) & other Ward at District General Hospital, AMRAVATI. | 609995.00 | 6100.00 |
| 3 | **Estimate No. 1454/EE/AMT/2023-24**, Providing & Erection of 11 Mtr Tubular Pole with 5 LED Flood Lights 6 No. Under Ghatladki Circle at GHATLADAKI, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati. | 814674.00 | 8200.00 |
| 4 | **Estimate No. 227 / EE/AMT/2024-25**, Providing Auto AMF Pannel and Supply Arrangement to District Women Hospital AMRAVATI, Dist. Amravati. | 308312.00 | 3100.00 |
| 5 | **Estimate No. 259/EE/AMT/2024-25**, Providing Main Panel to E.I. at Divisional Commissioner Office, AMRAVATI. | 614403.00 | 6200.00 |
| 6 | **Estimate No. 273/EE/AMT /2024-25**, Providing & Erection of 11 Mtr. Tubular Pole with 5 LED Flood Lights 8 No. at RAJURA Village, Dist. Amravati. | 818748.00 | 8200.00 |
| 7 | **Estimate No. 278/EE/AMT/2024-25**, Providing Renovation to LED Street Light, Flood Lights, Beautification of Pond Area & E.I. To Newly Constructed Lavatry for Security Guard at District Collector Bunglow at AMRAVATI (Under DPDC 2024-25) | 406677.00 | 4100.00 |
| 8 | **Estimate No. 501/EE/AMT/2024-25**, Providing Internal Electrical Installation to Proposed Agricultural Sub-Division Office at DHAMANGAON RAILWAY, Dist. Amravati. | 531158.00 | 5400.00 |
| 9 | **Estimate No. 507/EE/AMT/2024-25**, Providing Shifting of O.H. H.T. & L.T. Line due to Widenting of Road to Bhatkuli Amravati Road S.H. 280 Near Rest House at BHATKULI, Dist. Amravati. | 342061.00 | 3500.00 |
| 10 | **Estimate No. 532/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation to CCTV & Servillance Room at District Jail AMRAVATI. | 563652.00 | 5700.00 |
| 11 | **Estimate No. 535/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Renovation to Mahila Vibhag Room & Premises at District Jail, AMRAVATI. | 347337.00 | 3500.00 |
| 12 | **Estimate No. 573/ E/AMT/2024-25**, Providing Air Cooling, VRF Air Conditioning to Multipurpose Hall of Proposed Administrative Building Taluka Level at AMRAVATI. | 629268.00 | 6300.00 |
| 13 | **Estimate No. 583/EE/AMT/2024-25**, Providing Street Light to New Proposed Rural Hospital Building at CHANDUR BAZAR, Dist. Amravati. | 613583.00 | 6200.00 |
| 14 | **Estimate No. 584/EE/AMT/2024-25**, Providing Street Light to Old Hospital Building and P. M. Room at CHANDUR BAZAR, Dist. Amravati. | 548038.00 | 5500.00 |
| 15 | **Estimate No. 585/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation to Proposed Library hall at Government Medical College, AMRAVATI. | 612567.00 | 6200.00 |
| 16 | **Estimate No. 593/EE/AMT/2024-25**, Providing Online UPS to Main Operation Theatre at District Civil Hospital, AMRAVATI. | 430064.00 | 4400.00 |
| 17 | **Estimate No. 599/EE/AMT/2024-25**, Providing Shifting of L.T. O.H. Line Due to Road Crossing At Construction of Amravati- Mardi- Kurha Road at -8 in K 94/0 to 95/200 at AMRAVATI. | 444128.00 | 4500.00 |
| 18 | **Estimate No. 628/EE/AMT/2024-25**, Supplying & Installing Air Conditions & Inverter for Rest House Building at TEOSA Dist. Amravati. | 578635.00 | 5800.00 |
| 19 | **Estimate No. 633/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation to Administrative Building Ground Floor at Government Medical College Building, AMRAVATI. | 614240.00 | 6200.00 |
| 20 | **Estimate No. 634/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation to Administrative Building First Floor at Government Medical College Building, AMRAVATI. | 614240.00 | 6200.00 |
| 21 | **Estimate No. 656/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Rennovation to Harsha Banglow of Addtitional SP Amravati Gramin, Near Vidyut Bhawan, Panchawati Road, AMRAVATI. | 359966.00 | 3600.00 |
| 22 | **Estimate No. 663 / EE/AMT/2024-25**, Providing Renovation to E.I. & Main Panel of Biopesticide Control Laboratory For Agriculatural Deptt. Tapovan Road, AMRAVATI. | 456667.00 | 4600.00 |
| 23 | **Estimate No. 672/EE/AMT /2024-25**, Providing LED Strip on Street Light Pole on Road Divider in CHANDUR BAZAR, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati. (Amdar Sthanik Vikas Karyakram 2024- 25) | 613714.00 | 6200.00 |
| 24 | **Estimate No. 673/EE/AMT/2024-25**, Providing LED Strip on Street Light Pole From Gulab Bag Mangal Karyalaya to Jaistambh Chouk at ACHALPUR, Dist. AMRAVATI (Amdar Sthanik Vikas Karyakram 2024-25) | 613714.00 | 6200.00 |
| 25 | **Estimate No. 674/EE/AMT/2024-25**, Providing LED Strip on Street Light Pole From Jaistambh Chouk to Baitul Chowk at ACHALPUR, Dist. Amravati. (Amdar Sthanik Vikas Karyakram 2024-25) | 613714.00 | 6200.00 |
| 26 | **Estimate No. 685/EE/AMT/2024-25**, Providing E.I. Work & Street Light Pole to Veterenary Polyclinic at MALHARA TO ACHALPUR Dist. Amravati. | 331583.00 | 3400.00 |
| 27 | **Estimate No. 697/EE/AMT/2024-25**, Providing E.I. Work And Street Light Pole to Veternary Despensary Class-I at BRAMHANWADA GOVINDPUR, Tq. Dist. Amravati. | 338877.00 | 3400.00 |
| 28 | **Estimate No. 760/EE/AMT/2024-25**, Providing LED Pannel Light Fittings & Ceiling Fans to Administrative Building Ground & First Floor at Government Medical College Building, AMRAVATI. | 613340.00 | 6200.00 |
| 29 | **Estimate No. 761/EE/AMT/2024-25**, Providing Switchgears & Pannel to Administrative Building Ground Floor at Govt. Medical College Building, AMRAVATI. | 586509.00 | 5900.00 |
| 30 | **Estimate No. 762/EE/AMT/2024-25**, Providing E.I. Work And Street Light Pole to Veternary Polyclinic at PARSAPUR, Tq. ACHALPUR, Dist. Amravati. | 331583.00 | 3400.00 |
| 31 | **Estimate No. 763/EE/AMT/2024-25**, Providing E.I. Work And Street Light Pole to Veternary Polyclinic at PATHROT, Tq. ACHALPUR, Dist. Amravati. | 331583.00 | 3400.00 |
| 32 | **Estimate No. 770/EE/AMT/2024-25**, Providing Additional Work of Power Supply Arrangement 100 KVA Transformer for Proposed S.D.O. Office Building at DARYAPUR, Dist. Amravati. | 418886.00 | 4200.00 |
| 33 | **Estimate No. 775/EE/AMT/2024-25**, Providing Replacement of Dameged MCCB Panel & Faulty Cable at Boys Hostel Building at Government Engineering College AMRAVATI. | 502657.00 | 5100.00 |
| 34 | **Estimate No. 776/EE/AMT/2024-25**, Providing Replacement of Faulty Cable at Government Engineering College AMRAVATI. | 412560.00 | 4200.00 |
| 35 | **Estimate No. 779/ E/AMT/2024-25**, Providing Iron Jali on Cable Trench for enclosing the Cables in New Workshop Building at Industrial Training Institute, AMRAVATI. | 619865.00 | 6200.00 |
| 36 | **Estimate No. 781/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation to Residential Jail Additional Suprintendent Quarter in Premises of District Jail at AMRAVATI DIST. AMRAVATI. | 614133.00 | 6200.00 |
| 37 | **Estimate No. 782/EE/AMT/2024-25**, Providing E.I. To New Rest House, ACHALPUR, Dist. Amravati. | 614687.00 | 6200.00 |
| 38 | **Estimate No. 783/ EE/AMT/2024-25**, Providing Renovation to Electrical Installation of Chandur Bazar, Rest House Building Tq. CHANDUR BAZAR, Dist. Amravati. | 340024.00 | 3500.00 |
| 39 | **Estimate No. 788/ EE/AMT/2024-25**, Providing Supply & Erection of Invertor, Battery & Air Conditioers at Rest House MOZARI, Dist. Amravati. | 613756.00 | 6200.00 |
| 40 | **Estimate No. 790/ EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation to Dean Chember & Meeting Hall at Administrative Building Government Medical College Building, AMRAVATI. | 613679.00 | 6200.00 |
| 41 | **Estimate No. 809/ EE/AMT/2024-25**, Providing and Erection of 12.5 Meter highmast on Forest Road at Sindhi Colony Ganesh Nagar, Tq. ACHALPUR, Dist. Amravati. | 401282.00 | 4100.00 |
| 42 | **Estimate No. 816/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation to Proposed Lecture hall No-2 at Government Medical College, AMRAVATI. | 613897.00 | 6200.00 |
| 43 | **Estimate No. 817/ EE/AMT /2024-25**, Providing Electrical Installation to Proposed Lecture hall No-1 at Government Medical College, AMRAVATI. | 613897.00 | 6200.00 |
| 44 | **Estimate No. 818/EE/AMT/2024-25**, Providing Renovation to Electrical Installation of Women & Children Hospital at ACHALPUR, Dist. Amravati. | 542901.00 | 5500.00 |
| 45 | **Estimate No. 826/EE/AMT/2024-25**, Providing E.I. To Second Floor of ITI College Building CHANDUR BAZAR, Dist. Amravati. | 614642.00 | 6200.00 |
| 46 | **Estimate No. 827/ EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installaytion to the Keshav Narayan Temple and Sabhagruh at ACHALPUR, Dist. Amravati. | 442541.00 | 4500.00 |
| 47 | **Estimate No. 828/EE/AMT/2024-25**, Providing Renovation to E.I. At Eye Division in Kutir Hospital at ACHALPUR, Dist. Amravati. | 614683.00 | 6200.00 |
| 48 | **Estimate No. 829/EE/AMT/2024-25**, Providing Renovation to E.I. Administrative Building of Govt. ITI College at CHANDUR RAILWAY, Dist. Amravati. | 596161.00 | 6000.00 |
| 49 | **Estimate No. 830/EE/AMT/2024-25**, Providing Supply Arrangement & Filld Light For EVM Godown Multipurpose Hall at TEOSA, Ta. TEOSA, Dist. AMRAVATI. | 614572.00 | 6200.00 |
| 50 | **Estimate No. 831/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation for EVM Godown Multipurpose Hall at TEOSA, Ta. TEOSA, Dist. Amravati. | 614587.00 | 6200.00 |
| 51 | **Estimate No. 832/EE/AMT/2024-25**, Providing E.I. Work and Street Light Pole to Veternary Polyclinic at MALKHED Tq. CHANDUR RLY. Dist. Amravati. | 336829.00 | 3400.00 |
| 52 | **Estimate No. 833/ EE/AMT /2024-25**, Providing and Erection of 12.5 Meter highmast on Forest Road at Sindhi Colony Ganesh Nagar, Tq. ACHALPUR, Dist. Amravati. | 401282.00 | 4100.00 |
| 53 | **Estimate No. 836/EE/AMT/2024-25**, Providing Renovation to Electrical Installation for Tahsil Office Building at ACHALPUR, Dist. Amravati. | 613346.00 | 6200.00 |
| 54 | **Estimate No. 837/EE/AMT/2024-25**, Providing Renovation to Electrical Installation of S.D.O. & S.D.P.O. Office Building at PARATWADA, Tq. Achalpur, Dist. Amravati. | 611025.00 | 6200.00 |
| 55 | **Estimate No. 838/EE/AMT/2024-25**, Providing Renovation to Electrical Installation At. Gramin Ruganalaya CHANDUR RLY, Dist. Amravati. | 575973.00 | 5800.00 |
| 56 | **Estimate No. 839/EE/AMT/2024-25**, Providing E.I. To First Floor at I.T.I. College Building BHATKULI Tq. BHATKULI, Dist. Amravati. | 614642.00 | 6200.00 |
| 57 | **Estimate No. 840/EE/AMT/2024-25**, Providing & Erecting Highmast Pole (With 8 LED Flood Light Fittings) at Chitra Chouk, AMRAVATI. | 371706.00 | 3800.00 |
| 58 | **Estimate No. 857/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Rennovation to District Arth & Sankhyiki Vibhag, District Planning Office, AMRAVATI. | 361812.00 | 3700.00 |
| 59 | **Estimate No. 863/ EE/AMT/2024-25**, Providing Renovation E.I. To Warkshop 1 of Govt. ITI College at CHANDUR RAILWAY, Dist. Amravati. | 608841.00 | 6100.00 |
| 60 | **Estimate No. 864/EE/AMT /2024-25**, Providing Renovation E.I. To Warkshop 2 of Govt. ITI College at CHANDUR RAILWAY, Dist. Amravati. | 608841.00 | 6100.00 |
| 61 | **Estimate No. 865/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Renovation To Ground Floor of Govt. ITI Girls, AMRAVATI. | 570836.00 | 5800.00 |
| 62 | **Estimate No. 867/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Renovation To First Floor of Govt. ITI Girls, AMRAVATI. | 492683.00 | 5000.00 |
| 63 | **Estimate No. 869/EE/AMT/2024-25**, Providing Replacement of Electrical Installation to Workshop, Prin ciple Cabin at Technical School & Junior College Near S.T. Depot Road, AMRAVATI. | 577359.00 | 5800.00 |
| 64 | **Estimate No. 872/EE/AMT/2024-25**, Providing High Mast, Area Lighting & Submersible Borewell Pump at Administrative Building Government Medical College, AMRAVATI. | 611170.00 | 6200.00 |
| 65 | **Estimate No. 874/ EE/AMT/2024-25**, Providing Supply & Erection of Electrical Installation at various Wards in District Genrel Hospital AMRAVATI. | 614550.00 | 6200.00 |
| 66 | **Estimate No. 880/EE/AMT/2024-25**, Providing Electrical Installation to Exhibition Plaza and Supply Cable to Theme Park RIDDHAPUR, Tq. Morshi, Dist. Amravati. | 604816.00 | 6100.00 |
| 67 | **Estimate No. 882/EE/AMT/2024-25**, Providing & Erection of 9 Meter Octogional Street Light Pole at Village SUKALI, Tq. & Dist. Amravati. | 592398.00 | 6000.00 |

**As per G.R. No.CAT-2022/PR.KR. 50/BLD.2/Mantralaya, Mumbai, Dt. 12.05.2022 Post Qualification Criteria of the Bid Capacity is Applicable for er who have been allotted or declared L1 for 3 (Three) Works during this FININCIAL YEAR till submission of Bid for this Work.**
Tender form, conditions of contract, specifications and contract drawings can be **bidder must purchase the bidding documents via online mode from www.mahapwd.gov.in by clicking on "Pay PWD Online"** after entering the details, payment of **Rs. 590/- (Including GST) (Rupees Five Hundred Ninety Only)** Ad be paid online using payment gateway. The fees of tender document will be non refundable. Further information regarding the work can be obtained from above office.

**: TENDER SCHEDULE:**

| | | |
|---|---|---|
| Cost of Tender Form | : | **Rs. 590/- Including GST** |
| Last Date & Place of Issue of Tender From | : | From 01.10.2024 Time 10.00 Hours To 08.10.2024 Time 18.55 Hours |
| Receipt of EMD fees, to be paid FDR/B.G. Only | : | Earnest Money in the form of Term Deposit Receipt for a period of one year issued by a scheduled bank duly endorsed in the name of the **Executive Engineer, P. W. Electrical Division Amravati** to be submitted in Envelop No. 1. |
| Receipt of online Tender Document fees, to be paid online only via Payment Gateway mode Only. | : | Document Tender Fee to be paid via online mode Only. |
| Last Date & Place of Manually Submission of Technical & Financial Tender | : | Office of the Executive Engineer, P. W. (Electrical) Division, Amravati. Date 10.10.2024 Time 14.00 Hours |
| Performance Security Deposit | : | If the Lowest Tenderer has quoted below the Scheduled cost by more than 1%, he should submit Performance Security Deposite in the form of Bank Guarantee/ Demand Draft/F.D.R. in the office of The Executive Engineer, Public Works (Electrical) Division Amravati within 8 days from the opening of envelop No. 2 as per Govt. Circular No. CAT/2017/C.No.08/Bld.-2, Dt. 26/11/2018. |
| Registration class of Contractor | : | Contractor Registered in Appropriate Class |

**Sd/-**
**Executive Engineer**
**Amravati Electrical Division,**
**Public Works Division, Amravati.**

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/क्र.५/C-४१०४